# पद्मश्री डॉ.ग.गो.जाधव महाविद्यालय

# गगनबावडा

## कार्यक्रम अहवाल

## युवा संवाद शिबीर

बुधवार दिनांक २ ऑगस्ट २०२३ रोजी पद्मश्री डॉ.ग.गो.जाधव महाविद्यालय गगनबावडा येथे तहसिलदार कार्यालय, गगनबावडा यांच्या संयुक्त विद्यमाने युवा संवाद शिबीर आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून तहसीलदार डॉ शैलजा पाटील उपस्थित होत्या. कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयाचे वाणिज्य विभागप्रमुख डॉ.एस.एस.पानारी, एन.एस.एस.समन्वयक प्रा.ए .एस.कांबळे ,ग्रंथपाल व्ही.एस.पाटील, प्रा.डी.के.पाटील, प्रा.एच.एस.फरास, प्रा. आर. आर. सरनोबत, प्रा. एस. एस. घाटगे तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.सतीश देसाई, संस्थापक सचिव डॉ.विद्या देसाई यांचे मार्गदर्शन लाभले.

पुढारी



गगनबावडा : येथील पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव महाविद्यालयात युवा संवाद अंतर्गत दाखले वाटप करताना तहसीलदार शैलजा पाटील. सोबत इतर.

### गगनबावडा येथे युवा संवाद शिबिर

**गगनबावडा : पुढारी वृत्तसेवा**

पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव महाविद्यालय, महसूल व वन विभाग, तहसीलदार कार्यालय गगनबावडा यांच्या संयुक्त विद्यमाने शासनाच्या महसूल सप्ताहअंतर्गत युवा संवाद शिबिर महाविद्यालयात आयोजित करण्यात आले होते.

यावेळी तहसीलदार डॉ. शैलजा पाटील प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. अध्यक्षस्थानी प्र. प्राचार्य डॉ. व्ही. एस. पाटील होत्या.

यावेळी तहसीलदार पाटील यांनी तहसीलदार कार्यालयामार्फत राबवल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. मंडल अधिकारी लांबोरे, तलाठी दिगंबर शिकलगार यांनी ई-पीक पाहणी ॲपची माहिती दिली. यावेळी तहसीलदार कार्यालयामार्फत विविध दाखल्यांचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी संस्थाध्यक्ष प्रा. सतीश देसाई यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी तलाठी राजू कुंटे, गणेश शिंदे, महा-ई-सेवा चालक व मतदान केंद्रस्तरीय अधिकारी प्रा. ए एस जमादार, प्रा. एच एस फरास, प्रा. एस. एस. घाटगे आदी उपस्थित होते.

डॉ. एस. एस. पानारी यांनी प्रास्ताविक केले. प्रा. ए. एस. कांबळे यांनी आभार मानले. प्रा. डी. के. पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

My Kolhapur Edition
Aug 3, 2023 Page No. 11
newspaper.pudhari.co.in